**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्रीमती आशा उत्तम कुंजीर
कमला नेहरू हॉस्पिटल, मंगळवार पेठ, पुणे-११ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
सर्व शिक्षा अभियान, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८ श्री. हरी भिवा भारती — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी,
सर्व शिक्षा अभियान, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८ श्रीमती शारदा लोंढे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१२१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १६.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,<br>सर्व शिक्षा अभियान, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>पिंपरी, पुणे-१८ श्री. हरी भिवा भारती<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी,<br>सर्व शिक्षा अभियान, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>पिंपरी, पुणे-१८ श्रीमती शारदा लोंढे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.५.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.१२.२००८रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १६.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सर्व शिक्षा अभियान, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी माहिती अपुरी व चुकीची दिल्याचे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात नमूद केले आहे. मात्र त्यांच्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत मुद्देनिहाय उत्तर दिले. कोणतीही माहिती चुकीची व अपुरी दिली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी श्रीमती शारदा लोंढे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सर्व शिक्षा अभियान, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. हरी भिवा भारती यांनी केले. सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. देवेंद्र मा. टाटीया
स.नं.१०६/४, पद्मश्री पॅलेस, वळवण,
लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
लोणावळा नगरपरिषद, लोणावळा,
ता. मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१४१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १५.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. देवेंद्र मा. टाटीया
स.नं.१०६/४, पद्मश्री पॅलेस, वळवण,
लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे श्री. प्रकाश एस. पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
लोणावळा नगरपरिषद, लोणावळा,
ता. मावळ, जि. पुणे श्री. योगेश गोडसे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.५.२००८ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १५.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत आपल्या तक्रारीनुसार कार्यवाही केली नाही. त्याविषयी केलेल्या माहितीच्या तक्रार अर्जावर अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी आपली तक्रार योग्य असल्याचे नमूद करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, जि. पुणे यांना दिले, त्यानुसार कार्यवाही केली नाही. हा निर्णय, विभागीय आयुक्तांचे पत्र व जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती आपण मागितली होती. माहितीशी संबंधित नसलेल्या एका पत्राची एका पृष्ठाची प्रत आपल्याला देण्यात आली. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, जि. पुणे यांनी माहिती न दिल्याचे नमूद करून अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी एक महिन्यात माहिती देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद यांना दिले. तरीही माहिती दिल्याबद्दल संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. देवेंद्र मा. टाटीया यांनी केली.

अपीलकर्ता श्री. टाटीया यांनी या विषयाबाबत माहिती-मागणी अर्जाव्यतिरिक्तही पत्रव्यवहार केला असून त्यांच्या तक्रारीची दखल घेऊन त्या त्या वेळी कार्यवाही करण्यात आली. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी अपिलात दिलेल्या आदेशानुसार संबंधित बांधकामाबाबत पाहणी केली गेली व त्याचा अहवाल प्रतिनिधी पाठवून व्यक्तिशः देण्याचा प्रयत्न केला. परंतु श्री. टाटीया यांनी माहिती घेतली नाही. संबंधित

प्रकरणातील वस्तुस्थितीचा समक्ष पंचनामा करून नियमानुसार योग्य कार्यवाही करण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद यांनी केले.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी दिलेले आदेशही प्रशासकीय कार्यवाहीचे आहेत, त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. तथापि ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद श्री. सुनिल लहाने यांनी माहिती देण्याबाबत केलेली कार्यवाही कागदपत्रावरून स्पष्ट होत नाही व विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी त्याबाबत खुलासा करू शकले नाहीत, हे लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. टाटीया यांच्या मूळ अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ४ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. असा अहवाल अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगर परिषद डॉ. सुनिल लहाने यांनी आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अहवाल सादर केलेला नाही. याबाबतच्या व शास्ती का लावू नये याबाबतच्या खुलाशासह दि. २०.६.२०१० पर्यंत आयोगास अहवाल सादर करावा. अनुषंगिक कार्यवाहीबाबतचा निर्णय त्यानंतर घेण्यात येईल.

पुणे

दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधीर माधव जोशी
५८७, दत्तप्रसाद सोसायटी, पुणे सिंहगड रोड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सिंहगड एज्युकेशन सोसायटी,
वडगाव बु., सिंहगड रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
सिंहगड एज्युकेशन सोसायटी, वडगाव बु., सिंहगड रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१५१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
सिंहगड एज्युकेशन सोसायटी, वडगाव बु., सिंहगड रोड, पुणे श्री.प्रभाकर वामन घाटपांडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.५.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने भास्करराव शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयोग, नागपूर व इतर रिट पिटीशन क्र.५२९४ / २००८, दि.२८.४.२००९ या प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी या विनाअुनदानित शिक्षण संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे प्रतिपादन प्रशासकीय अधिकारी, सिंहगड एज्युकेशन सोसायटी, वडगाव बु., सिंहगड रोड, पुणे श्री.प्रभाकर वामन घाटपांडे यांनी केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा निर्णय लक्षात घेता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. हरिभाऊ रघुनाथ काकडे
१५/बी-१, सर्वत्र सहकारी गृहरचना मर्यादित,
पौड रस्ता, कोथरूड, पुणे-४१ ०२९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे-४ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे टेक्निकल
इनस्टिट्यूट, पुणे-४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८४ / पुणे + २४१/२००९/ पुणे + २६६२ / पुणे |
| | सुनावणीची तारीख | २३.३.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. हरिभाऊ रघुनाथ काकडे
१५/बी-१, सर्वत्र सहकारी गृहरचना मर्यादित,
पौड रस्ता, कोथरूड, पुणे-४१ ०२९

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे-४ डॉ. एस.एन.कानेटकर

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
डी. ई. एस. टेक्निकल इनस्टिट्यूट, पुणे-४
प्रा. श्री. अशोक यशवंत इंगळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.३.२००८ |

६ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डेक्कन एज्युकेशन सोसायटीची 'डी. ई. एस. टेक्निकल इन्स्टिट्यूट, पुणे' यांनी आपल्या अर्जाला विहित मुदतीत कोणतेही उत्तर दिले नाही व अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपिलाची दखल घेतली नाही. दोन वर्षांचा कालावधी उलटूनही माहिती मिळाली नाही, त्यामुळे संपूर्ण माहिती नि:शुल्क व विनाविलंब मिळावी, जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डी. ई. एस. टेक्निकल इन्स्टिट्यूट, पुणे यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. हरिभाऊ रघुनाथ काकडे यांनी केली. जन माहिती अधिकारी माहितीबाबत आपल्या अन्य अर्जांची गल्लत करीत आहेत, असेही प्रतिपादन श्री. काकडे यांनी केले.

याच संदर्भात ते सन १९७४ ते १९८८ अशा प्रदीर्घ काळातील माहिती त्यांच्या स्वत:च्या सेवेच्या अनुषंगाने मागत असतात. विविध स्वरूपाचा पत्रव्यवहार, तसेच विविध न्यायासनांकडेही अर्ज व तक्रारी सातत्याने करीत असतात. त्याबाबत सर्व पातळ्यांवर व व्यापक स्वरुपाचा पत्रव्यवहार आतापर्यंत करण्यात आला आहे. त्यांच्या मागणीतील काही माहिती इन्स्टिट्यूटकडे; तर काही संस्थेकडे असते, त्यांच्या अर्जावरील कार्यवाहीच्या संदर्भातील निवेदन सादर करण्यासाठी मुदत मिळावी, अशी विनंती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डी. ई. एस. टेक्निकल इन्स्टिट्यूट, पुणे प्रा. श्री. अशोक यशवंत इंगळे यांनी केली. आयोगाने ती मान्य केली व जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डी. ई. एस. टेक्निकल इन्स्टिट्यूट, पुणे प्रा. अशोक यशवंत इंगळे / अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे डॉ. एसन.एन. कानेटकर यांनी चार दिवसांत खुलासेवार निवेदन सादर करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डी. ई. एस. टेक्निकल इन्स्टिट्यूट, पुणे प्रा. अशोक यशवंत इंगळे व अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे डॉ. एस.एन.कानेटकर यांनी दि. ३०.३.२०१० च्या पत्रान्वये विस्तृत अहवाल सादर केला. आयोगाने दिलेल्या मुदतीत अहवाल सादर न केल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

श्री. काकडे व डी. ई. एस. टेक्निकल इन्स्टिट्यूट / डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्यामध्ये १० वर्षांहून अधिक काळापासून वाद आहे. श्री. काकडे संस्थेत सहाय्यक अधिव्याख्याता होते. संस्थेने त्यांची चौकशी करुन त्यांना मार्च १९९७ मध्ये सेवेतून कमी केले. त्यानंतर त्यांनी दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), पुणे, शाळा न्यायाधिकरण, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे दाखल केलेले दावे फेटाळले गेले. शाळा न्यायाधिकरणाच्या निकालाविरूध्द श्री. काकडे यांनी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. श्री. काकडे यांनी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे केलेल्या तक्रारीवरून संचालनालयाने पाठविलेल्या पत्रांना इन्स्टिट्यूटने व संस्थेने वेळोवेळी उत्तर दिले आहे. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यातील कागदपत्रे श्री. काकडे यांच्याकडे आहेत. असे असूनही सातत्याने त्याच त्याच स्वरूपाची माहिती मागणारे अर्ज करून श्री. काकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा गैरवापर करून संस्थेवर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. 'तंत्रशिक्षण संचालनालयाने घालून दिलेले निकष डावलून नियुक्त केलेल्या संपूर्ण शिक्षकांची माहिती द्यावी,' अशा स्वरुपाच्या मागण्या ते करतात, असे प्रा. इंगळे व डॉ. कानेटकर यांनी खुलाशात म्हटले आहे. संबंधित सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. सर्व पातळ्यांवर उत्तरे दिलेली असल्यामुळे माहिती देण्याचा प्रश्न येत नाही, व संस्थेने व डी. ई. एस. टेक्निकल इन्स्टिट्यूटने दिलेल्या उत्तराची अपीलकर्त्यास माहिती असल्यामुळे पुन्हा माहिती मागण्याचा त्यांना अधिकार नाही, असेही या खुलाशात प्रा. इंगळे व डॉ. कानेटकर यांनी म्हटले आहे. ही भूमिका योग्य नाही. अपीलकर्त्यास कोणती माहिती हवी आहे, यावरुन माहिती मिळण्यास तो पात्र आहे की नाही, हे ठरत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही केली गेली पाहिजे. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळच्या प्रपत्रातील नोंदीनुसार करावयाच्या कार्यवाहीबाबतही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य तो काटेकारपणा पाळलेला नाही, याबाबत जन माहिती अधिकारी प्रा. अशोक यशवंत इंगळे व अपिलीय प्राधिकारी डॉ. एस. एन. कानेटकर यांना समज देण्यात येत आहे.

संस्था विशिष्ट संदर्भात तंत्रशिक्षण संचालनालयाशी संपर्क साधत नसल्यास त्यासंबंधीची कारणे अपीलकर्त्यांनी विचारली आहेत. तसेच 'सर्व पत्रे', 'सर्व पत्रव्यवहार' अशा स्वरूपाची ढोबळ स्वरूपातील व सरसकट मागणी केली आहे.

उच्च न्यायालयातील दाव्याच्या अनुषंगाने मागितलेली माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. काकडे यांनी अन्य दोन अपिले (अपील क्र. २६६२ व २४१) आयोगाकडे केली आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता उभय बाजूंमधील वादापोटी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा वापर केला जात आहे, असे दिसते. अन्य विभागांकडे / न्यायासनांकडे दाखल केलेली कागदपत्रे, पत्रव्यवहार, प्रशासकीय कार्यवाही व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करावयाची कार्यवाही याची सरमिसळ उभय बाजूंनी केली आहे. अन्य संदर्भात अपीलकर्त्यास कागदपत्रे उपलब्ध असणे हे माहितीच्या अधिकारात त्या कागदपत्रांच्या प्रती न देण्याचे कारण होऊ शकत नाही. मात्र अपीलकर्त्याने पुनःपुन्हा त्याच त्याच कागदपत्रांची मागणी करणेही योग्य नाही. त्यांची मागणी विस्तृत माहितीची आहे, तसेच काही मुद्दयांची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये नमूद केल्यानुसार 'माहिती'च्या व्याख्येत न बसणारी आहे, (उदा. तंत्र शिक्षण संचालनालयाच्या 'निकषांचे उल्लंघन करून' नियुक्त केलेल्या सेवकांची माहिती, अशा स्वरूपाची मागणी. )

उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेता संस्थेने श्री. काकडे यांना संबंधित सर्व संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करुन देणे व श्री. काकडे यांनी अभिलेखाचे अवलोकन करुन आपल्याला आवश्यक असलेल्या प्रतींची मागणी नेमकेपणाने व लेखी नोंदवून त्या प्राप्त करून घेणे उचित ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२.  डेक्कन एज्युकेशन सोसायटीने संबंधित प्रकरणातील सर्व संचिका अपीलकर्ता श्री. हरिभाऊ रघुनाथ काकडे यांना अवलोकनासाठी नि:शुल्क उपलब्ध करुन द्याव्यात व त्यातील ज्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी श्री. काकडे लेखी स्वरूपात नोंदवितील त्या प्रती मागणी नोंदविल्यापासून एक आठवड्यात त्यांना नि:शुल्क द्याव्यात. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डी. ई. एस. टेक्निकल इन्स्टिट्यूट, पुणे-४, यांनी याप्रमाणे कार्यवाही करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. 14 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

२.  डेक्कन एज्युकेशन सोसायटीने संबंधित प्रकरणातील सर्व संचिका अपीलकर्ता श्री. हरिभाऊ रघुनाथ काकडे यांना अवलोकनासाठी नि:शुल्क उपलब्ध करुन द्याव्यात व त्यातील ज्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी श्री. काकडे लेखी स्वरूपात नोंदवितील त्या प्रती मागणी नोंदविल्यापासून एक आठवड्यात त्यांना नि:शुल्क द्याव्यात. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डी. ई. एस. टेक्निकल इन्स्टिट्यूट, पुणे-४, यांनी याप्रमाणे कार्यवाही करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. 14 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हनुमान बिसमदास पंडीत
केडगाव स्टेशन, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
येवला, ता.येवला, जि.नाशिक — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, ममदापूर वि.का.सहकारी
सेवा संस्था मर्यादित, ममदापूर, ता.येवला, जि.नाशिक

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हनुमान बिसमदास पंडीत
केडगाव स्टेशन, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
येवला, ता.येवला, जि.नाशिक प्रतिनिधी श्री.व्ही.पी.ठाकूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, ममदापूर वि.का.सहकारी सेवा
संस्था मर्यादित, ममदापूर, ता.येवला, जि.नाशिक श्री.डी.आर.येवले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.१०.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.११.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.११.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२६.१२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा सचिव, ममदापूर वि.का.सहकारी सेवा संस्था मर्यादित, ममदापूर, ता.येवला, जि.नाशिक यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार प्रसिध्द करावयाची अशीच माहिती आपण मागितलेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी शुल्क कळविले, ते योग्य नाही. माहिती निःशुल्क मिळाली पाहिजे, म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, येवला, जि.नाशिक यांच्याकडे अपील केले. परंतु शुल्क भरणे आवश्यक असल्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, येवला, जि.नाशिक यांनी दिला. त्यानंतर शुल्क भरण्यास गेलो असता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ममदापूर वि.का.सहकारी सेवा संस्था मर्यादित, ममदापूर, ता.येवला, जि.नाशिक श्री.आर.एम.साळवे यांनी अरेरावीचे वर्तन केले. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, ममदापूर वि.का.सहकारी सेवा संस्था मर्यादित, ममदापूर, ता.येवला, जि.नाशिक यांनीही आपल्याशी गैरवर्तन केले. त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.हनुमान बसवदास पंडित यांनी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ममदापूर वि.का.सहकारी सेवा संस्था मर्यादित, ममदापूर, ता.येवला, जि.नाशिक यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत शुल्क कळविले होते. मात्र सध्या ते निलंबित असून संबंधित प्रकरणी संचिकेत कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. गैरवर्तनाचा अपीलकर्त्यांचा आरोप चुकीचा आहे. ते शुल्क भरण्यासाठी आले त्यावेळी आपण पदभार घेत होतो. माहिती तयार आहे, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव,

ममदापूर वि.का.सहकारी सेवा संस्था मर्यादित, ममदापूर, ता.येवला, जि.नाशिक श्री.आर.एम.साळवे यांनी केले. माहितीची प्रत त्यांनी सादर केली. ममदापूर विविध कार्यकारी संस्थेच्या नफा वाटपा संदर्भात श्री.पंडित यांनी विचारणा केली असून संस्था तोट्यात असल्याने नफावाटपाचा प्रश्न नव्हता, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, येवला, जि.नाशिक यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.पी.ठाकूर यांनी नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ममदापूर वि.का.सहकारी सेवा संस्था मर्यादित, ममदापूर, ता.येवला, जि.नाशिक यांनी विहित मुदतीत शुल्क कळविले, ते अपीलकर्त्याने भरले नाही. सुनावणीनंतरही अपीलकर्त्याने शुल्क भरल्याचे दिसत नाही. तथापि विहित मुदतीत माहिती दिल्याचेही स्पष्ट होत नाही. हे लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शिवाजी किसन वीर
द्वारा सौ. अलका शिवाजी वीर
रूम नं.५, कर्मचारी निवासस्थान,
पंचायत समिती, इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,
सोलापूर जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूसंपादन अधिकारी,
सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूसंपादन अधिकारी,<br>सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.४.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १७.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

संपादन होणाऱ्या क्षेत्राचा भूसंपादनाबाबतचा दाखला मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री. शिवाजी किसन वीर यांनी केली होती. परंतु संबंधित प्रस्ताव त्यावेळी संयुक्त मोजणी स्तरावर होता. भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यामुळे दाखला व अनुषंगिक कागदपत्रे देता येत नसल्याचे त्यांना कळविले. त्यांनी प्रथम अपील केलेले नाही. आवश्यक माहिती संपादन मंडळाने द्यावी, असे दि. २३.१२.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी सूचित करण्यात आले होते. तसे संपादन मंडळास कळविण्यात आले होते. परंतु अद्याप संपादन झालेले नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, सोलापूर श्री. प्रमोद राहुल गायकवाड यांनी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वैभव किशोर म्हवान
स.नं.१८/२८३, गोंधळेनगर, हडपसर,
पुणे-३८

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १७, डॉ.आंबेडकर मार्ग,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक शिक्षण उपसंचालक,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२३०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वैभव किशोर म्हवान
स.नं.१८/२८३, गोंधळेनगर, हडपसर,
पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १७, डॉ.आंबेडकर मार्ग,
जि.पुणे श्री.सुनिल मगर

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक शिक्षण उपसंचालक,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, जि.पुणे श्री.व.मा.गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.०३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.०५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०३.०६.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.०६.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, जि.पुणे यांनी ७० दिवस उशिरा, खोटी व अपूर्ण दिली. सेवाज्येष्ठता यादी त्यांच्याकडे मागितली असता संबंधित विद्यालयाकडून घेण्यास सांगितले. त्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता यांनी केली.

श्री.म्हवान यांनी ७ वर्षांच्या कालावधीतील माहिती मागितली होती. त्यासाठी ३० दिवसांची अतिरिक्त मुदत मागणारे पत्र त्यांना पाठविले होते. मागितलेली माहिती तयार झाल्यावर दि.१३.०५.२००८ रोजी त्यांना शुल्क कळविले. दि.२१.०५.२००८ रोजी त्यांनी शुल्क भरल्यानंतर दि.२२.०५.२००८ रोजी माहिती दिली. सेवाज्येष्ठता यादी ही संस्थेच्या अभिलेख कक्षातील असते. त्यामुळे ती संस्थेकडून घेण्यास कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, जि.पुणे श्री.व.मा.गायकवाड यांनी केले. मूळ अर्जातील मुद्दयांच्या अनुषंगाने अतिरिक्त कागदपत्रे न मिळाल्याची तक्रार श्री.म्हवान करीत आहेत. तसेच प्राचार्य पदाला चुकीची मान्यता मिळाली त्याची चौकशी व्हावी, अशा प्रकारच्या त्यांच्या मागण्या आहेत. अशा मागण्या किंवा त्याबाबतच्या पुराव्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १७, डॉ.आंबेडकर मार्ग, जि.पुणे श्री.सुनिल मगर यांनी केले.

अपीलकर्त्यास अतिरिक्त कागदपत्रे हवी असल्यास त्यासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. प्रशासकीय कार्यवाहीबाबतचे आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. तथापि, संबंधित विद्यालयाने अपीलकर्त्यास सेवाज्येष्ठता यादी पुरविणे आवश्यक आहे. आठ दिवसांत अपीलकर्त्यास सेवाज्येष्ठता यादी देण्याचे आयोगाचे आदेश जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण उपसंचालक, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, जि.पुणे श्री.व.मा.गायकवाड यांनी प्राचार्य, हरकचंद रायचंद बाफना डी.एड.कॉलेज, वडगांव मावळ (पुणे)

यांना कळवावेत, यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित प्राचार्य कारवाईस पात्र ठरतील, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आदेश

१.अपील निकाली

२.आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मोखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, जि.पुणे श्री.व.मा.गायकवाड यांनी दि.२५.०५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

स्थळ : पुणे
दि. 13 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

१. श्री. उदय नारायण भेलके
२. श्री. नारायण रामचंद्र भेलके
श्री हेरंभ को-ऑप हौसिंग सोसायटी,
फ्लॅट नं.१९, जीवनधारा नगर,
धनकवडी, पुणे-४३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**१) अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
ता.भोर, जि.पुणे

**२) अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय भोर,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय भोर,
जि.पुणे

**२) जन माहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी,**
मौजे भोर, ता.भोर, जि.पुणे

**३) जन माहिती अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे

**४) जन माहिती अधिकारी तथा नगर रचना अधिकारी,**
भोर विभाग, नारायण पेठ,
पुणे-३०

**५) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
भोर जि.पुणे

**६) जन माहिती अधिकारी तथा कामगार तलाठी,**
भोर जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२३३+२२३४+२२३५+२२३६+२२३७ +२२३८/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८/०३/२००८, १९/०४/२००८, ७/०४/२००८, |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३/०५/२००८, ७/०६/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०५/२००८, २६/०५/२००८, |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३/०५/२००८, |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) मौजे भोर, जि.पुणे येथील इनाम प्रवर्गातंर्गत येणाऱ्या जमिनीबाबतची इ.स. १६०० ते आज अखेरपर्यंतची माहिती<br>२) मौजे भोर, जि.पुणे येथील दुय्यम निबंधक यांच्याकडे दि.३०/०४/२००७ रोजी नोंद झालेल्या लेस-पेंन्डसी दस्त नंबर ११६७/२००७ ची नोंद ७/१२ च्या उताऱ्यात होणेबाबत<br>३) मौजे भोर, जि.पुणे येथील सर्व्हे नं.१५९/१ वर केलेल्या बांधकामाबाबतची सन १९४५ पासून ते आजपर्यंतची माहिती<br>४) मौजे भोर, जि. पुणे येथील मंजूर फेरफार क्र.४१८२ या आ.टी.एस. संपूर्ण प्रकरणांची छायाप्रत<br>५) मौजे भोर, जि.पुणे येथील सर्व्हे नं. १५९/१ चे फेरफार क्र.३३५३, ३५४६,३५४७, ३५८०, ३५९०, ३७२७, ३७७७, व ३८२९ या आर.टी.एस. संपूर्ण प्रकरणांच्या छायाप्रती<br>६) मौजे भोर, जि. पुणे येथील सन २००७ पासून कार्यरत असणाऱ्या गाव कामगार तलाठी, मंडल अधिकारी व तहसीलदार यांच्याबाबतची माहिती<br>७) मौजे भोर, जि. पुणे येथील तहसील कार्यालयात माहिती प्राप्त करण्यासाठी सन २००७ पासून आजपर्यंत केलेल्या एकूण ७ अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. उदय नारायण भेलके यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपिले केलेली आहेत. राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.३०/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त वरील एकूण सहा अपिलांचा

समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. भेलके हे अनुपस्थित होते. श्री. भेलके यांच्या माहिती-मागणी अर्जांच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीसाठीचे शुल्क भरण्याबाबत त्यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी वेळोवेळी कळविले असल्याचे संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच कार्यालयात उपलब्ध नसणाऱ्या माहितीसंदर्भात देखील अपीलकर्त्यास उत्तर देण्यात आले असल्याचेही प्रपत्रात नमूद केलले आहे. श्री. भेलके यांच्या काही अपिलांमध्ये प्रशासकीय कार्यवाहीची मागणी केली असल्याचे दिसून येते. (उदा. मौजे भोर, जि.पुणे येथील दुय्यम निबंधक यांच्याकडे दि.३०/०४/२००७ रोजी नोंद झालेल्या लेस-पेंन्डसी दस्तनंबर ११६७/२००७ ची नोंद ७/१२ च्या उताऱ्यात होणबाबत.) अशी मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील सहा अपिले निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पांडुरंग दत्तात्रय भोळ
मु.पो.धर्माधिकारी प्लॉट, गाडेगाव रोड, बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन
सोलापूर विभागीय कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
राज्य परिवहन कार्यालय, बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२८ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पांडुरंग दत्तात्रय भोळ
मु.पो.धर्माधिकारी प्लॉट, गाडेगाव रोड, बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन
सोलापूर विभागीय कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.१०.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.११.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.५.१.२०१० |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन कार्यालय, बार्शी, जि.सोलापूर यांनी अपुरी माहिती दिली. कामगारांच्या वेतनचिठ्ठीच्या प्रती व अनेक मुद्दयांची माहिती दिली नाही. वाहतूक नियंत्रक पदाच्या परीक्षेत आपली पाचवेळा वैद्यकीय तपासणी केली. अन्य कर्मचाऱ्यांची मात्र वैद्यकीय तपासणी केली नाही. ती का केली नाही याचा खुलासाही दिला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.पांडुरंग दत्तात्रय भोळ यांनी केली.

श्री.भोळ याच्या मूळ अर्जाला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या नियमावलीत नमूद केल्यानुसार आवश्यक असलेले मुद्रांक शुल्क लावलेले नव्हते. त्यामुळे हा अर्ज माहितीच्या अधिकारात येत नसल्याचे त्यांना कळविले. त्याविरूध्द त्यांनी केलेल्या अपिलानंतर श्री.भोळ यांनी विभाग नियंत्रक या अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज न करता प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे यांच्याकडे केला. प्रादेशिक व्यवस्थापकांच्या सूचनेनुसार श्री.भोळ यांना माहिती देऊन त्यांची पोहोच घेतली आहे. त्यानी पुन्हा केलेल्या पत्रव्यवहारानंतर त्यांच्यावरील आरोपपत्रांमधील तक्रारीच्या नकलांसह सर्व माहिती देऊ केली असता त्यांनी ती नाकारली. त्यांच्याविरूध्द गैरवर्तनाची एकूण २१ प्रकरणे दाखल असून त्या संदर्भातील माहितीही देण्यात आली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर श्री.डी.आर.थोरात यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.७,८ यासारख्या मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ मधील तरतुदीनुसार 'माहिती' ठरत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
2 4 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. आनंद रामचंद्र दिपाळे
मु.पो.विश्रामबाग, शिवदर्शन कॉलनी,
ता. मिरज, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, रत्नागिरी — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्र. अधीक्षक (रा. प.)
शिक्षण विभाग, (प्राथमिक),
जिल्हा परिषद, रत्नागिरी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३०/२०१० /सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १५.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री. आनंद रामचंद्र दिपाळे<br>मु.पो.विश्रामबाग, शिवदर्शन कॉलनी,<br>ता. मिरज, जि. सांगली<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्र. अधीक्षक (रा. प.)<br>शिक्षण विभाग, (प्राथमिक), जिल्हा परिषद, रत्नागिरी<br>श्री. राजाराम गोविंद जाधव | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१२.२००९ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

प्रवास भत्त्याची देयके आदीबाबतची माहिती विहित मुदत संपल्यानंतर देण्यात आली. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही व पूर्ण माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. आनंद रामचंद्र दिपाळे यांनी केली.

संबंधित कर्मचारी रजेवर असल्यामुळे माहिती विहित मुदतीत देता आली नाही, तसेच देयकाबाबत असलेल्या त्रुटींविषयी संबंधित व्यक्तीशी चर्चा झाली होती. देयके मंजुरीवर होती. त्यामुळे मंजूर झाल्याशिवाय तपशील देणे शक्य झाले नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्र. अधीक्षक, शिक्षण विभाग ( प्राथमिक), जिल्हा परिषद, रत्नागिरी श्री. राजाराम गोविंद जाधव यांनी केले. संबंधित लिपिकाने अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्या निदर्शनास प्रथम अपील न आणल्यामुळे दखल घेतली गेली नाही, असे अपिलीय प्राधिकारी यांना कळविल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले. आयोगाच्या आदेशानुसार त्याबाबतचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी दि. २६.४.२०१० च्या पत्रान्वये सादर केला. संबंधित अपील सुनावणीसाठी ठेवण्याची सूचना देऊनही लिपिक श्रीमती एस. जे. हातखंबकर यांनी कर्तव्यात कसून केली. त्यांच्याकडून प्रथमच असे घडले असल्यामुळे त्यांना लेखी समज देण्यात आली, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी या अहवालात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 21 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कयामुद्दीन बाबुलाल शेख
मु.पो.मालेगांव बु.।।
ता.बारामती, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
मुख्यालय (१), पोलीस आयुक्त पुणे यांचे कार्यालय,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
पोलीस आयुक्त पुणे यांचे कार्यालय,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३००/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/१२/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/७/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/८/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शासन गृह विभागाच्या दिनांक १६/०६/१९८८ च्या शासननिर्णयाची प्रत व त्या अनुषंगाने सदर शासननिर्णयावरील मत /भाष्य | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. कयामुद्दीन बाबुलाल शेख यांचे प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

सदर अपिलासोबतची कागदपत्रे पाहता अपीलकर्ता श्री. शेख यांनी मूळ माहिती अर्जात शासननिर्णयावरील मत विचारले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मत, भाष्य या स्वरुपाची विचारणा करता येत नाही, तसे जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, पोलीस आयुक्त पुणे यांचे कार्यालय, यांनी कळविले असून ते योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अर्जुन मारुती शिरसाट
सर्कल नं.३, येरवडा मध्यवर्ती कारागृह,
पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,**
जिल्हा पुरवठा कार्यालय अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९/०५/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,**<br>जिल्हा पुरवठा कार्यालय अहमदनगर,<br>श्री.विजय तवळे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०/०३/२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६/०४/२००९ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अंबिकानगर स्वस्त धान्य दुकाना संदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. अर्जुन मारुती शिरसाट यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि. १९/०५/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. अपीलकर्ता श्री.शिरसाट यांना त्यांच्या

माहिती-मागणी अर्जानुसार दि. १६/०४/२०१० रोजी माहिती दिली असल्याची पोहोच जन माहिती अधिकारी तथा प्रभारी सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, श्री.विजय तवळे यांनी आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
दि :- 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश ज्ञानेश्वर यमजाळ
सचिव, निवडुंग सहकारी गृहनिर्माण संस्था(म.), धायरी, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२१+२३९२/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे श्री.शि.ना.बोलभट

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.६.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.७.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३०.८.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३.११.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.४.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीलाही ते उपस्थित नव्हते.

खडकवासला कालवा उपविभाग, क्र.१ मधील शिपाई श्री.सुधाकर दिनकर किर्वे यांच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी असल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.महेश ज्ञानेश्वर यमजाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.यमजाळ यांनी श्री.किर्वे यांच्या संदर्भात माहिती मागणारे व अन्य अर्ज व पत्रव्यवहार अनेक पातळ्यांवर केले असून त्यांनी मागितलेली माहिती त्या त्या वेळी देण्यात आली आहे. श्री.किर्वे यांच्या मालमत्ता विवरणपत्रापासून त्यांच्यावरील वैद्यकीय उपचारापर्यंत विविध प्रकारची माहिती श्री.यमजाळ यांनी मागितली आहे. त्यांना माहिती दिल्याची पोहोच कार्यालयाकडे आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, खडकवासला, पाटबंधारे विभाग, पुणे श्री.शि.ना.बोलभट यांनी पूरक कागदपत्रांसह केले. मालमत्ता विवरणपत्रासारख्या बाबतीत 'ते का प्राप्त करून घेतले नाही,' अशा स्वरूपाच्या प्रशासकीय कार्यवाहीबाबतची खुलासेवजा विचारणा व त्यानुसार कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, खडकवासला, पाटबंधारे विभाग, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. प्रशासकीय

कार्यवाही करून माहिती मिळवून देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत जगन्नाथ माळकर
शिवम, स्वप्नसागर हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.११७, सेक्टर नं.११,
पंचवटी कॉम्प्लेक्सनजिक,(प), धनकवडी-चव्हाणनगर रोड,
चव्हाणनगर(पद्मावती), पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर, हाथीमहल,
गंजी गल्ली, सोमवार पेठ, कोल्हापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद
शिक्षण मंडळ, तासगाव, सिध्देश्वर मार्केट, सिध्देश्वर चौक,
तासगाव, मु.पो.ता.तासगाव, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत जगन्नाथ माळकर
शिवम, स्वप्नसागर हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.११७, सेक्टर नं.११,
पंचवटी कॉम्प्लेक्सनजिक,(प), धनकवडी-चव्हाणनगर रोड,
चव्हाणनगर(पद्मावती), पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर, हाथीमहल,
गंजी गल्ली, सोमवार पेठ, कोल्हापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.दिनकर पाटील

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद शिक्षण मंडळ, तासगाव, सिध्देश्वर मार्केट, सिध्देश्वर चौक, तासगाव, मु.पो.ता.तासगाव, जि.सांगली श्री.आर.जी.शिंदे | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.४.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

सावित्रीबाई फुले दत्तक-पालक योजनेच्या संदर्भात आपण दोन वेळा मागूनही माहिती मिळाली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांच्या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद शिक्षण मंडळ, तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली यांनी माहिती दिली नाही. या योजनेतील रकमेचा योग्य प्रकारे विनियोग झाला नसल्यामुळे ही माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.वसंत जगन्नाथ माळकर यांनी केले.

श्री.माळकर वारंवार अशा स्वरूपाची माहिती मागत असतात व वेळोवेळी सर्व माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. 'सदर योजना राबविण्यात प्रतारणा झाली आहे, तेव्हा खुलाशासह माहिती द्यावी,' अशा स्वरूपाची विचारणा व गृहितावर आधारित भाष्य करून संदिग्ध स्वरूपाची माहितीची मागणी ते करीत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद शिक्षण मंडळ, तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली श्री.आर.जी.शिंदे यांनी केले. मात्र योजनेत लाखो रूपयांचा भ्रष्टाचार असल्यामुळे माहिती जाणीवपूर्वक दिली जात नाही. आपल्या अनेक मुद्दयांना बगल देणारी माहिती दिली आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.वसंत जगन्नाथ माळकर यांनी केली.

अपीलकर्त्यांनी भाष्य अथवा आरोप करून अभिप्रायवजा मागणी 'माहिती' म्हणून करणे योग्य नाही. मात्र न मिळालेल्या माहितीबाबतचे नेमके पत्र जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद शिक्षण मंडळ, तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली यांना श्री.माळकर यांनी सादर करावे, त्यानंतर दोन दिवसांत जन माहिती अधिकारी यानी त्यांना देय माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. श्री.माळकर यांनी दि.१६.४.२०१० रोजी जन माहिती अधिकाऱ्यांना निवेदनाची प्रत दिली. त्याची प्रत आयोगास सादर केली. मात्र या निवेदनात नेमक्या माहितीची मागणी नाही, भाष्य आहे. त्यामुळे त्याची दखल घेता येणार नाही. प्रशासकीय कार्यवाहीच्या अनुषंगाने श्री.माळकर यांची तक्रार असल्यास त्याबाबत ते उचित न्यायासनाकडे दाद मागू शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

2 4 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. ताराचंद शंकरराव पवार
१७६, औंध गाव, पुणे-७ .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, शिवाजीनगर, पुणे-५ .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, वडगाव मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १५.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री. ताराचंद शंकरराव पवार<br>१७६, औंध गाव, पुणे-७<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, शिवाजीनगर, पुणे-५ डॉ. केदारी नारायण जाधव<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,<br>सहकारी संस्था, वडगाव मावळ, जि. पुणे श्रीमती अलका बी. पवार | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.८.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १५.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

सहकारी गृहनिर्माण संस्थेचे मूळ १२६ सभासद वगळून संस्था स्थापन केली गेली, त्याची यादी मागितली असता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वडगाव मावळ, जि.पुणे यांनी ती संस्थेकडून घेण्यास सांगितले. आपले सभासदत्व बेकायदेशीरपणे रद्द केले, त्या संदर्भातील माहिती चुकीची दिली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. ताराचंद शंकरराव पवार यांनी केले.

अपीलकर्त्याच्या अर्जातील मुद्दे भाष्यवजा आरोप व तक्रारी करणारे आहेत. प्रशासकीय कार्यवाहीची त्यांची मागणी आहे. आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध असणारी माहिती त्यांना देण्यात आली, ती योग्य आहे. तक्रार, आक्षेप व प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वडगाव मावळ, जि.पुणे श्रीमती अलका बी. पवार व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे डॉ. केदारी नारायण जाधव यांनी केले. श्री. पवार यांनी कोणत्याही कागदपत्रांची मागणी केलेली नाही, असेही त्यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी श्रीमती अलका बी. पवार व अपिलीय प्राधिकारी डॉ. केदारी नारायण जाधव यांचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे. तथापि विपराव सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, तळेगाव, ता. वडगाव मावळ या संस्थेच्या नोंदणीच्या वेळची सभासदांची यादी प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संस्थेच्या अ धारिकेच्या संस्था नोंदणीच्या वेळची सभासद यादी प्रमाणित करून अपीलकर्त्यास देण्यात आली, असा अहवाल अपीलकर्त्याची पोहच असलेल्या पत्राच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वडगाव मावळ, जि.पुणे श्रीमती अलका बी. पवार यांनी दि. २६.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ